# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ
# Tilak Maharashtra Vidyapeeth

Estd. 1921

(Declared as 'Deemed to be a university' Under Section - 3 of UGC Act 1956 vide Notification No. F9-19/85-U-3 dated 24th April 1987 bu the Government of India.)

Vidyapeeth Bhavan, Mukund Nagar, Gultekdi, pune-411037 (India)

TMV 100th Anniversary 1921-2021

Tel : 91-020- 24261856, 24403000, 24403007
E-mail : registrar@tmv.edu.in

Fax : 91-020- 24266068, 24403100
Website : www.tmv.edu.in


जा.क्र. परीक्षा/२०२२/१४०

दि. २१ फेब्रुवारी २०२२

## परिपत्रक

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या ३६ व्या पदवीप्रदान समारंभासाठी आपल्याला आमंत्रित करण्यात येत आहे. हा समारंभ शनिवार दि. २६ मार्च २०२२ रोजी सकाळी १०:०० वाजता मुकुंदनगर, गुलटेकडी, पुणे येथील विद्यापीठाच्या प्रांगणात कोविड १९ बाबतच्या शासनाच्या सर्व निर्बंधांचे पालन करून आयोजित केला आहे. डिसेंबर २०२० व मे २०२१ दरम्यान पदवी/पदविका अंतिम वर्षाच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना या प्रसंगी पदवी/पदविका प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येतील. विद्यार्थ्यांनी कृपया खालील सूचनांची नोंद घ्यावी व त्याचे पालन करून सहकार्य करावे.

१. पदवीप्रदान समारंभाला येताना विद्यार्थ्यांनी आपल्यासोबत पदवी प्रमाणपत्राकरिता भरलेल्या शुल्काची मूळ पावती व पदवी/पदविकेच्या शेवटच्या वर्षाच्या गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत आणावी. त्याशिवाय पदवी प्रमाणपत्र व उत्तरीय दिले जाणार नाही.

२. प्रमाणपत्र वाटपाची वेळ : सकाळी ८.३० ते ९.३० अशी राहील.
प्रमाणपत्र वाटपाचे ठिकाण : वैदिक संशोधन मंडळ, जयंतराव टिळक संकुला समोर,
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ आवार, मुकुंदनगर,
गुलटेकडी, पुणे-३७.

३. ज्या विद्यार्थ्यांनी पोस्टाद्वारे प्रमाणपत्राची मागणी केली आहे त्यांना एप्रिल २०२२ अखेरपर्यंत पदवी प्रमाणपत्रे मिळतील. सदर विद्यार्थ्यांना पदवीप्रदान समारंभाच्यावेळी प्रमाणपत्रे दिली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

४. विद्यार्थ्यांना जे उत्तरीय देण्यात येईल ते त्यांनी सदर समारंभ संपेपर्यंत परिधान करणे आवश्यक आहे.

५. डिसेंबर २०२० व मे २०२१ परिक्षेव्यतिरिक्त पूर्वी झालेल्या परीक्षामध्ये पदवी/पदविका उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना सदर पदवीप्रदान समारंभानंतर दि. २९/०३/२०२२ ते ३०/०३/२०२२ दरम्यान पदवी प्रमाणपत्रे देण्यात येतील, त्यामुळे अशा विद्यार्थ्यांना पदवीप्रदान समारंभादिवशी पदवी प्रमाणपत्र मिळणार नाही.

६. जर विद्यार्थी पदवी/पदविका प्रमाणपत्र स्विकारणेसाठी स्वतः हजर राहू शकत नसेल तर येणाऱ्या व्यक्तीजवळ पदवी/पदविका अंतिम वर्षाच्या गुणपत्रिकेची छायांकित प्रत व शुल्क भरल्याचे चलन असणे आवश्यक आहे. तसेच त्यांचेकडे त्याबाबत स्वतःच्या सहीने अधिकारपत्र द्यावे व त्यामध्ये स्विकारणाऱ्या व्यक्तीचे नाव व मोबाईल क्रमांकाचा उल्लेख करावा. पदवी/पदविका प्रमाणपत्र स्विकारण्यासाठी येणाऱ्या व्यक्तिने आपले ओळखपत्र बरोबर आणावे. (उदा. आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, वाहन चालक परवाना, पॅन कार्ड, पारपत्र इत्यादींपैकी एकाची छायांकित प्रत.) अशा पद्धतीने अधिकारपत्र देऊन एखादी व्यक्ती पदवी प्रमाणपत्र घेऊन गेल्यास त्याची जबाबदारी विद्यापीठावर असणार नाही.

७. सदर पदवी प्रदान समारंभाच्या वेळी सर्वांनी मास्क परिधान करणे आवश्यक असुन विद्यार्थ्यांनी कोविड प्रतिबंधक लस घेतल्याचे प्रमाणपत्र सोबत ठेवावे.

परीक्षा नियंत्रक